## फडणवीस हे ५० गद्दारांचे शिलेदार : खा.शिंदे


**सोलापूर** : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ५० गद्दारांचे शिलेदार आहेत,अशी टीका काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे. सोलापूरमधील लाडकी बहीण योजनेच्या वचनपूर्ती सोहळ्यात फडणवीस यांनी केलेल्या टीकेला शिंदे यांनी उत्तर दिले आहे. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आलेल्यांना पंधराशे रुपयांची किमत काय कळणार, अशी टीका फडणवीस यांनी केली होती. त्याला खा. शिंदे यांनी सडेतोड प्रत्युत्तर देताना फडणवीस यांना ५० गद्दारांचे शिलेदार असे संबोधले आहे. याशिवाय, लाडकी बहीण योजनेच्या वचनपूर्ती सोहळ्यासाठी डीपीडीसीची निधी वळविल्याचा आरोपही त्यांनी केला. शिंदे म्हणाल्या, लाडकी बहीण योजनेच्या वचनपूर्ती सोहळ्यासाठी डीपीडीसीमधून सहा कोटी रुपये घेण्यात आले आहेत. एसी, कुलर, पंख्यासाठी हा निधी वापरण्यात आला आहे.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com

। शुक्रवार, दि. ११ ऑक्टोबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# संकट टळले, नामुष्की ओढवली




## मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देवू नये, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर गुरूवारी सुनावणी होवू शकली नाही.चार आठवडे या याचिकेवरची सुनावणी मुंबई हायकोर्टाने पुढे ढकलल्याने महायुतीच्या सरकारवरील संकट विधानसभा निवडणुकिच्या तोंडावर टळले आहे.सुनावणी पुढे गेल्याने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र राज्य सरकारच्या निर्णयानुसार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण करण्यास सुरुवात केली होती. यानंतर राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यास सुरूवात केली होती. मात्र कुणबी प्रमाणपत्रावर आक्षेप घेत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यावरील सुनावणी गुरुवारी (१० ऑक्टोबर) ४ आठवड्यांसाठी पुढे ढकलण्यात आली. यामुळे राज्य सरकारला दिलासा मिळाला असून विधानसभा निवडणुकांपूर्वी मराठा समाजाल कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी केलेल्या आंदोलनाची दखल घेत राज्य सरकारने कुणबीच्या नोंदी आढळलेल्या मराठा समाजाला प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली आहे. यासंदर्भात राज्य सरकारने २६ जानेवारी २०२४ रोजी अधिसूचना जारी केली होती. या अधिसूचनेत मराठ्यांच्या सगेसोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊ नका आणि दिलेलं कुणबी प्रमाणपत्र स्थगित करा, अशी प्रमुख मागणी करत मंगेश ससाणे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. पुढील महिन्यात विधानसभा निवडणूक असल्याने मुंबई उच्च न्यायालयाने मंगेश ससाणे यांच्या याचिकेवर निकाल दिल्यास राज्य सरकारला मोठा फटका बसण्याची शक्यता होती. मात्र, आज पार पडलेल्या सुनावणीवेळी न्यायालयाने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेविरोधातील याचिका चार आठवड्यांसाठी तहकूब केली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारला दिलासा मिळाला आहे. त्यामुळे आता जोपर्यंत विधानसभा निवडणूक होत नाहीत, तोपर्यंत मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यास राज्य सरकारला सध्यातरी कुणलीही अडचण होताना दिसत नाही.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



ते नेहमी स्वत:च खूप गोंधळलेले असतात!!

| कल्याण |
|---|
| 588-13-490 |

| मुंबई |
|---|
| 130-48-350 |

## आरक्षणाचे शुद्धीपत्रक एकाच रात्री रद्द

**मुंबई/प्रतिनिधी**

धनगर समाजाला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या दृष्टीने सरकारने शुद्धीपत्रक काढले होते. मात्र हे शुद्धीपत्रक एकाच रात्री रद्द करण्याची नामुष्की सरकारवर ओढावली.

गेल्या काही दिवसांपासून आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्यातील वातावरण तापताना दिसत आहे. काही दिवसांपूर्वी धनगर समाजाला आदिवासी कोट्यातून आरक्षण देण्याच्या निर्णयाविरोधात आदिवासी समाजाच्या आमदारांनी मंत्रालयातील सुरक्षा जाळीवर उड्या मारून आंदोलन केले होते. यानंतर दोन दिवसांपूर्वी धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी मंत्रालयाच्या दुसऱ्या मजल्यावरून सुरक्षा जाळीवर उड्या मारल्या होत्या.

यानंतर राज्य सरकारकडून धनगर ऐवजी धनगड वाचावे, असे शुद्धीपत्रक काढण्यात आले होते. मात्र धनगड हे आपल्या राज्यात नाहीत, असे म्हणत धनगर समाजाने या शुद्धीपत्रकावर आक्षेप घेतला होता. तसेच धनगड जातीचे सात दाखले हे छत्रपती संभाजीनगरमध्ये काहींनी काढले होते. महसूल व सामान्य प्रशासन विभागाने शुद्धीपत्रक काढले होते. मात्र, हे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने रद्द केले आहे. तसेच चुकीचे शुद्धीपत्रक काढणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही धनगर समाजाच्या नेत्यांनी केली आहे. महायुती सरकारने सप्टेंबरमध्ये धनगर आरक्षणासाठी नेमलेल्या 'सुधाकर शिंदे समिती'ने आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खिल्लारे कुटुंबातील सहा सदस्यांनी धनगड जमातीची प्रमाणपत्रे मिळवली होती. ही प्रमाणपत्रे बोगस असून ती रद्द करावीत, अशी धनगर समाजाच्या आंदोलकांची मागणी होती. मात्र जात पडताळणी समितीला जात प्रमाणपत्रे रद्द करण्याचे अधिकार नाहीत. त्यामुळे मुख्यमंत्र्याच्या निर्देशानंतर तसे अधिकार देण्यात आले आणि आज धनगड प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली आहेत.

दरम्यान, धनगरांना आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे अशी मागणी सातत्याने करण्यात येत आहे. तर, दुसरीकडे धनगरांना आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्यास आदिवासी नेत्याांनी विरोध केला आहे. धनगर समाज हा आदिवासी नसून त्यांचा समावेश आदिवासी प्रवर्गात केल्यास खऱ्या आदिवासींच्या संधी हिरावल्या जातील, अशी आदिवासी नेत्यांची भूमिका आहे. त्यामुळे धनगर समाजाला अनुसूचित जमातीत आरक्षण देण्यासाठी सरकारवर दबाव वाढला असतानाच आता धनगड प्रमाणपत्रे रद्द केल्याने वाद वाढला आहे.

